॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जनसंपर्क विभाग

**जळगाव दि. ०५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र** विद्यापीठाच्या प्रशाळांसाठी शनिवार दि. ७ डिसेंबर रोजी आविष्कार संशोधन स्पर्धा होणार असून यामध्ये जवळपास ३०० विद्यार्थी सहभागी होणार आहे.

या स्पर्धेत विषय निहाय सहा गट करण्यात आले आहेत. त्यामध्ये पहिल्या गटात मानव्यविद्या, भाषा व ललित कला, Annदुसऱ्या गटात वाणिज्य, व्यवस्थापन आणि विधी, तिसऱ्या गटात विज्ञान ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जैवशास्त्र, गणित, पर्यावरणशास्त्र, गृह आणि संगणशास्त्र, चौथ्या गटात कृषि आणि पशुसंवर्धन, पाचव्या गटात अभियांत्रिकी व तंत्रज्ञान व सहाव्या गटात औषधिनिर्माणशास्त्र यांचा समोवश आहे. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर, आणि पदव्युत्तरपदवी या तीन संवर्गात होणार आहे. ३०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून यामध्ये १८१ पोस्टर व ०९ मोड्युलद्वारे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

विद्यापीठाच्या पदवी प्रदान सभागृहात सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उदघाटन होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे अध्यक्ष ानी राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून ओरिएंट सिमेंट लि. चे उपाध्यक्ष अतुलकुमार अग्रवाल, सहायक महाव्यवस्थापन रोहीत जोशी हे प्रमुख पाहुणे असतील तसेच प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्य.प.सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. पवित्रा पाटील, प्रा. म.सु. पगारे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांची उपस्थिती असणार आहे. अशी माहिती समन्वयक प्रा. रमेश सरदार व उपसमन्वयक डॉ. विशाल पराते यांनी दिली.

**बातमी नं. २**

**जळगाव दि. ०५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र** विद्यापीठात दि. १७ व १८ डिसेंबर रोजी शिक्षकांच्या क्षमता विकसनासाठी दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

पीएम उषा अंतर्गत ही कार्यशाळा होणार असून यामध्ये अध्यापनाच्या भविष्यातील पध्दती, ई कन्टेन , ई-परीक्षा व मूल्यांकन, कृत्रीम बुध्दीमत्तेचा संशोधन व शिक्षणात वापर आदी विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन होणार आहे. तीनही जिल्ह्यातील संलग्नीत महाविद्यालयांमधील शिक्षकांना यामध्ये भाग घेता येणार असून अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागास संपर्क साधावा असे आवाहन विभागप्रमुख डॉ. मनीषा इंदाणी यांनी केले आहे.

.............................................................................................................................................

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४** **दिनांक: ५ डिसेंबर, २०२४**

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी